# प्रेसनोट दि. २९/०७/२०१७

## सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा पुणे शहर यांचे कडुन हायप्रोफाईल परदेशी मुलीकडून वेश्या व्यवसाय करवून घेणा-या मसाज पार्लरवर छापा कारवाई

दि.२८.०७.२०१७ रोजी गुन्हे शाखेकडील पोना/३८७२ नितीन लोंढे यांना मिळालेल्या गोपनीय माहीती नुसार चिवा स्पा सेंटर, फॅारच्युना बिल्डींग, सातवा मजला, शिवार गार्डन चौक, रेनबो मॅाल समोर, पिंपळे सौदागर, पुणे – २७ या ठिकाणी चिवा स्पा मसाज सेंटरच्या नावाखाली थायलंडच्या हायप्रोफाईल परदेशी मुलींना नोकरीचे व जादा पैशाचे अमिष दाखवून अवैध्य वेश्याव्यवसाय करवुन घेत असल्याची माहीती मिळाले वरुन, गुन्हे शाखेच्या पथकाकडुन पडताळणीद्वारे छापा कारवाई करण्यात आली.

अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखा पुणे शहर चे पोलीस निरीक्षक श्री.संजय पाटील यांचे मार्गदर्शनाखाली सामाजिक सुरक्षा विभागाकडील अधिकारी व कर्मचारी यांनी चिवा स्पा सेंटर, फॅारच्युना बिल्डींग, सातवा मजला, शिवार गार्डन चौक, रेनबो मॅाल समोर, पिंपळे सौदागर, पुणे येथे चालत असलेल्या हायप्रोफाईल वेश्याव्यवसाया बाबत खातरजमा करुन तेथे छापा टाकला.छापा दरम्यान थायलंड या देशाच्या ५ सज्ञान पिडीत मुलींची वेश्याव्यवसायातुन सुटका करुन सदर स्पा मालक (१) अमोल खंडू जाधव वय ३१ रा साई प्रॅापर्टीचेवर, कोकणे चौक, टिप लखलख हॅाटल समोर पिंपळे सौदागर पुणे व सदर स्पा सेंटचा मॅनेजर (२) दिलू गुआनबे जिबाहो वय – २१ मुळ रा. नागालॅंड यांना ताब्यात घेतले. या गुन्ह्यामध्ये यातील पिडीत मुलींना स्पा मध्ये मसाज करणेसाठी ठेवून घेवून त्यांना जादा पैश्याचे अमीष दाखवून त्यांना वेश्यां व्यवसायामध्ये ओढल्याचे दिसुन आले आहे. या अनुषंगाने सांगवी पोलीस स्टेशन येथे गुरनं. ३२२/२०१७ ईटपा कायदा कलम ३,४,५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.श्री.प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा.श्री.पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे, मा.संजय निकम, सपोआ, गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली पोनि श्री.संजय पाटील, मसपोनि शितल भालेकर, सपोनि चंद्रकांत जाधव, नितीन लोंढे, संदीप गायकवाड, संजय गिरमे, रमेश लोहकरे, नितिन तेलंगे, महिला पो.हवा. गितांजली जाधव, कविता नलावडे, सरस्वती कागणे, ननिता येळे सचिन शिंदे यांनी केलेली आहे.